प्रेस नोट दिनांक २२/११/२०२१

| | |
|---|---|
| असीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. चद्रकांत गणपत गमरे, वय.४२ वर्षे, पद- कंत्राटी कनिष्ठ अभियंता (वर्ग-३), राष्ट्रीय आरोग्य अभियान, पंचायत समिती खेड, ता. खेड जि. रत्नागिरी, मुख्यालय- जिल्हा परिषद रत्नागिरी ता. जि. रत्नागिरी. |
| घटनेचे ठिकाण | श्री. बबन साळवी यांचे घराचे समोरील गेटजवळ, गणेश नगर, भरणे, ता. खेड जि. रत्नागिरी येथे |
| तक्रार अर्जातील लाचेची रक्कम | ६०,०००/-रुपये |
| मागितलेली लाचेची रक्कम | ६०,०००/- ते ७०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | स्विकारलेली लाचेची रक्कम ५०,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे नोंदणीकृत ठेकेदार असुन त्यांना मंडणगड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केन्द्रांतर्गत १४ उपकेन्द्रांची दुरुस्ती व अदयावतीकरण करणेकरीता ई- निवीदा भरलेली होती. त्या अनुषंगाने निविदा रक्कम ५०,०६,४९१/-रुपये प्रमाणे काम करण्याचे कार्यारंभ आदेश मिळाले होते. सदर कामाची देखरेख व कामाचे मुल्यांकन करणेकरीता जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेमार्फत कनिष्ठ अभियंता लोकसेवक गमरे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तक्रारदार यांनी अद्यापपर्यंत पुर्ण केलेल्या कामाचे मुल्यांकन करून बिलाचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयात सादर करणेकरीता लोकसेवक गमरे यांनी तक्रारदार यांनी केलेल्या कामाच्या रक्कमेच्या २ टक्केप्रमाणे ६०,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली. म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. चंद्रकांत गणपत गमरे यांचेविरुध्द अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी येथे दिनांक २४/०९/२०२१ रोजी लाचेच्या मागणीची तक्रार दिलेली आहे.<br>सदर तकारीचे अनुषंगाने दिनांक २४/०९/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री. चंद्रकांत गणपत गमरे, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी केलेल्या कामाचे मुल्यांकन वरिष्ठ कार्यालयात सादर करणेकरीता केलेल्या कामाच्या रक्कमेच्या २ टक्केप्रमाणे ६०,०००/- ते ७०,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याचे व ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार तक्रारदार यांचे प्रलंबित कामापैकी काही काम झाल्यानंतर त्या कामाचे मुल्यांकन करुन बील मंजुरीकरीता वरीष्ठ कार्यालयात पाठविणेकरीता तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेल्या रक्कमेपैकी ५०,०००/-रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारल्यानंतर त्यांना दिनांक २२/११/२०२१ रोजी १३.४३ वा. गणेशनगर भरणे ता. खेड, जि. रत्नागिरी येथे पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

(पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी — सत्यमेव जयते)

प्रविण आ.ताटे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी.